PREMIUM QUALITY FOOD IN DHULE
* Dosas * Sandwiches * Pav Bhaji * Pulao * Frankie
* Pizza * Fries * Chopsuey / Noodles * Momos
* Soup * Punjabi / Chinese / Continental * Starters
* Sizzler * Tandoor Starters * Chaap * Thali
Main Course * Juices * Falooda / Milkshakes / Dessert
JAIN FOOD AVAILABLE FREE HOME DELIVERY
B'Live ® SPACE FOR KITTY / BIRTHDAY PARTY
Delightful delicacies!
B'Live Restaurant
Below Card House, Lane No.5, Near Sonya Maruti, Dhule
9423928900 / 9307868768
Also available on zomato SWIGGY


# आपला महाराष्ट्र


मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३४२ ■ सोमवार १४ सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26





घरचा स्वाद, घरची शुध्दता...
शुद्ध खा.. स्वस्थ रहा
नवल
शुध्द तूप
म्हशीचे व गायीचे साजूक तूप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड,धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com


## मलेशिया पंतप्रधानांसोबत राहुल गांधींची ब्रेकफास्ट पे चर्चा तिसऱ्यांदा भेट, ; आंतरराष्ट्रीय, प्रादेशिक घडामोडींवर चर्चा



नवी दिल्ली, दि. १३ : राजधानी दिल्लीत सुरू असलेल्या अठराव ब्रिक्स शिखर परिषद दरम्यान मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेतली. यावेळी काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी-वाड्रा यांचीही उपस्थिती होती. या भेटी दरम्यान तिघांनी एकत्र नाश्ता करत विविध विषयांवर चर्चा केली. मात्र, या भेटीचे नेमके ठिकाण जाहीर करण्यात आलेले नाही. अन्वर इब्राहिम यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे राहुल गांधी यांच्यासोबत झालेल्या भेटीची माहिती दिली. आज सकाळी नाश्त्यावेळी माझे चांगले मित्र राहुल गांधी यांना पुन्हा भेटण्याची संधी मिळाली. आम्ही अलीकडील आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक घडामोडींवर आपले विचार मांडले, असे त्यांनी म्हटले आहे. काँग्रेसकडूनही या भेटीचे छायाचित्र सोशल मीडियावर शेअर करण्यात आले.

अन्वर इब्राहिम यांनी गेल्या आठ वर्षांत तीन वेळा भारताला भेट दिली असून, प्रत्येक वेळी त्यांची राहुल गांधी यांच्याशी भेट झाली आहे. राहुल गांधी आणि अन्वर इब्राहिम यांची पहिली भेट जानेवारी २०१९ मध्ये नवी दिल्ली येथे झाली होती. त्यावेळी इब्राहिम मलेशियाचे पंतप्रधान नव्हते. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष आणि मलेशियाचे माजी उपपंतप्रधान म्हणून ते रायसीना संवादात सहभागी होण्यासाठी भारतात आले होते. त्यावेळी राहुल गांधी काँग्रेसचे अध्यक्ष होते. नंतर अन्वर इब्राहिम यांनी मलेशियाचे पंतप्रधान झाल्यानंतर २१ ऑगस्ट २०२४ रोजी भारताला भेट दिली होती. त्यावेळीही त्यांची राहुल गांधी यांच्याशी भेट झाली होती. राहुल गांधी त्या वेळी लोकसभेतील (पान ४ वर)

## दिवाळीपूर्वी रेशनकार्डावर स्वस्त दरात शिधा मिळणार

मुंबई, दि. १३ : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शिधापत्रिकाधारकांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारकडून स्वस्त दरात साखर, डाळ आणि खाद्यतेल उपलब्ध करून देण्याची योजना आखली जात आहे. यंदा पूर्वीप्रमाणे १०० रुपयांत आनंदाचा शिधा देण्याऐवजी बाजारभावापेक्षा कमी दरात जीवनावश्यक वस्तू देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

महायुती सरकारकडून गेल्या दोन-तीन वर्षांत आनंदाचा शिधा योजनेंतर्गत १०० रुपयांत एक किलो रवा, एक किलो साखर, एक किलो चणा डाळ आणि एक किलो खाद्यतेल देण्यात आले होते. मात्र, सध्या या वस्तूंच्या किमती वाढल्या आहेत. साखरेचा दरही सध्या सुमारे ५५ ते ६० रुपये किलोपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे यंदा साखर, (पान ४ वर)

## गणेशोत्सव निमित्त नंदुरबार बाजारपेठेत गर्दी महाराष्ट्रासह गुजरात, मध्यप्रदेशात मुर्ती रवाना



**नंदुरबार, दि. १३ (प्रतिनिधी) : पुणे-मुंबईनंतर गणेशोत्सवासाठी प्रसिद्ध असलेल्या नंदुरबार शहरात गणेश चतुर्थीच्या पुर्वसंध्येला बाजारपेठेत मोठी गर्दी उसळली. पंडित दीनदयाळ चौक ते मोठा मंदिर परिसरापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा उभारण्यात आलेल्या गणेशमूर्तींच्या स्टॉलवर मूर्ती खरेदीसाठी गणेशभक्तांची मोठी गर्दी झाली होती. महाराष्ट्रासह गुजरात आणि मध्यप्रदेशात मोठ्या प्रमाणावर गणेशमूर्ती रवाना झाल्याने शहरातील प्रमुख मार्गांवर वाहतुकीची कोंडी निर्माण झाली.**

भव्य आकाराच्या गणेशमूर्ती आणि शहरातील अरुंद रस्ते यामुळे वाहनधारक तसेच गणेशभक्तांची चांगलीच कसरत झाली. गर्दीतून गणेशमूर्ती घेऊन जाणाऱ्या वाहनांना पोलिसांनी मोठ्या प्रयतकांनी मार्ग मोकळा करून दिला. नंदुरबार शहरात ३६ पेक्षा अधिक गणेशमूर्तींचे कारखाने असून ७० पेक्षा अधिक स्टॉल उभारण्यात आले आहेत. अनेक दिवसांपासून मूर्तींची खरेदी सुरू असली, तरी गणेश चतुर्थीच्या पूर्वसंध्येला भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढली. मूर्तींचे दर तुलनेने अधिक असतानाही भाविकांनी काटकसर न करता आपल्या पसंतीच्या आकर्षक गणेशमूर्तींची खरेदी केली. शहरातील अनेक मूर्तीकारांचे कारखाने (पान ४ वर)

## पतसंस्थेचा सभासद हाच खरा मालक अध्य.सुभाष अग्रवाल यांचे स्पष्टीकरण




**धुळे, दि. १३ : सभासद हाच संस्थेचा खरा मालक असतो. सभासद संचालकांची निवड करतात आणि निवडून आलेले संचालक चेअरमनची निवड करतात. त्यामुळे संस्थेच्या कारभारात सभासदांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. लोकमान्य नागरी सहकारी पतसंस्था सभासदांचा विश्वास संपादन करीत काम करीत आहे. त्यामुळे यंदाही आर्थिक शिस्त सांभाळत संस्था सभासदांना भेटवस्तू देणार आहे, असे स्पष्टीकरण पतसंस्थेचे अध्यक्ष सुभाष अग्रवाल यांनी सांगितले. त्यांच्या अध्यक्षतेखाली पतसंस्थेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली.**

शहरातील अग्रगण्य लोकमान्य नागरी सहकारी पतसंस्थेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आज ऊस गल्लीतील अग्रवाल भवन येथे संस्थेचे संस्थापक चेअरमन सुभाष चोथमल अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी संस्थेचे चेअरमन राकेश सुभाष अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. सभेत आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल व हिशोबपत्रके सभासदांसमोर सादर करून मंजूर करण्यात आली. तसेच आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी अंतर्गत हिशोब तपासणीची नियुक्ती करणे व त्यांचे मानधन निश्चित करणे, संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षण करून घेण्यासाठी लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे तसेच आयत्यावेळी आलेल्या विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना संस्थापक चेअरमन सुभाष चोथमल अग्रवाल म्हणाले की, सभासद हाच संस्थेचा खरा मालक असतो. सभासद संचालकांची (पान ४ वर)

## जावा समुद्रात तांत्रिक बिघाड २४० प्रवाशांचे जहाज बेपत्ता

बोर्नियो, दि. १३ : इंडोनेशियातील जावा समुद्रात रविवारी २४० प्रवाशांना घेऊन जाणारे प्रवासी जहाज अचानक बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे. व्हार्गो ट्रान्सपोर्ट-८ असे या जहाजाचे नाव असून, ते पूर्व जावामधील सुराबाया येथून बोर्नियो बेटावरील दक्षिण कालीमंतन प्रांताची राजधानी बंजारमासिनकडे रवाना झाले होते. प्रवासादरम्यान हवामानात अचानक बदल झाल्याने तसेच तांत्रिक बिघाडामुळे जहाजाचा किनाऱ्यावरील नियंत्रण कक्षाशी संपर्क तुटल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. जहाजाचे शेवटचे लोकेशन बंजारमासिन किनाऱ्यापासून सुमारे १४८ किलोमीटर अंतरावर जावा समुद्रात नोंदविण्यात आले होते.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक बचाव यंत्रणा सक्रिय झाली असून (पान ४ वर)

## शहाद्यात भाजपचे माजी शहराध्यक्ष चौधरी काँग्रेसमध्ये दाखल, राजकारणास कलाटणी




**शहादा, दि. १३ (का. प्र.) : शहादा शहराच्या राजकीय वर्तुळात महत्त्वाची घडामोड घडली असून भारतीय जनता पक्षाचे माजी शहराध्यक्ष यशवंतराव (यशवंत अण्णा) चौधरी यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. तळोदा येथे आयोजित काँग्रेसच्या भव्य कार्यकर्ता मेळाव्यात काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि बदलत्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर यशवंतअण्णा चौधरी यांचा काँग्रेस प्रवेश भाजपसाठी धक्का मानला जात आहे. त्यांच्या प्रवेशामुळे शहादा शहरातील राजकीय समीकरणांना नवी दिशा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**

तळोदा येथील कार्यकर्ता मेळाव्यास नंदुरबार जिल्ह्याचे खासदार गोवाल पाडवी, माजी मंत्री तथा ज्येष्ठ नेते के. सी. पाडवी, माजी मंत्री तथा ज्येष्ठ नेते पद्माकर वळवी, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दीपकभाई पटेल, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुहास नाईक आणि युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विकी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित वरिष्ठ नेत्यांनी यशवंत अण्णा चौधरी यांचे काँग्रेसचा दुपट्टा घालून पक्षात स्वागत केले. कार्यकर्ता मेळाव्यात पक्षप्रवेशासोबतच आगामी काळातील राजकीय वाटचाल, पक्ष संघटना मजबूत करणे, स्थानिक पातळीवरील विविध समस्या, कार्यकर्त्यांचे प्रश्न आणि पक्षविस्तार यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. काँग्रेसच्या नेत्यांनी यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. (पान ४ वर)

## श्रीराम देशपांडेच्या उभ्या कारमधून लॅपटॉप लंपास

**धुळे, दि. १३ : शहरातील मालेगाव रोडवरील आर्चिड हॉटेल समोर पार्क केलेल्या कारचे मागील दरवाज्याचे काचेतुन चोरट्यांनी ३४ हजारांचे रोकडसह साहित्य चोरून नेले.**

श्रीराम केशव देशपांडे (रा. विद्यावर्धिनी कॉलनी, साक्री रोड धुळे) यांनी आपली कार शुक्रवारी (ता.११) सायंकाळी हॉटेल समोर पार्क केलेली होती. काही वेळाने परत आले असता कारमधून साहित्य चोरी झाल्याचे आढळले. पंधरा हजारांची रोकड, पंधरा हजारांचा लॅपटॉप, हेडफोन कॅल्क्युलेटर, असा एकूण ३४ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. हवालदार जी. एच. देवरे तपास करीत आहेत.

## सुरक्षा अधिकाऱ्याच्या घरात धाडसी चोरी नेरला दागिने, पिस्तुल, काडतुसे, पैसे गेले

**धुळे, दि. १३ : मंत्रालयातील सुरक्षा अधिकाऱ्याच्या नेर (ता. धुळे) येथील घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी परवानाधारक पिस्तुल, काडतुसे, रोकड आणि सोन्याचे दागिने असा सुमारे ६० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेर येथील रहिवासी अनिल आनंदा सूर्यवंशी हे सैन्य दलातून निवृत्त झाले असून सध्या मंत्रालयात सुरक्षा अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. काही दिवसांपूर्वी सुट्टी असल्याने ते मनुदेवी नगर, मस्ती फाटा, नेर येथील घरी आले होते. त्यांना कामाच्या ठिकाणाहून तातडीने मुंबईला बोलावणे आल्याने ते मुंबईकडे रवाना झाले होते.**

दरम्यान, ड्युटीवर असताना त्यांच्याकडे असलेले परवानाधारक पिस्तुल नेर येथील घरी असल्याने ते घेण्यासाठी सूर्यवंशी शनिवारी गावाकडे आले. यावेळी त्यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तुटलेले आढळून आले. घरात चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तातडीने धुळे तालुका पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली असता चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केल्याचे स्पष्ट झाले. चोरट्यांनी सुमारे ३० हजार रुपये किमतीचे पिस्तुल, २ मॅगझीन, १० काडतुसे, २० हजार रुपयांची रोकड, १० हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी आणि कानातील बाळी, असा एकूण सुमारे ६० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी शनिवारी रात्री उशिरा धुळे तालुका पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक रविकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## सावेरच्या अपघातात एक ठार तीन जखमी, चालक अटकेत

शिरपूर, दि. १३ (का. प्र.) : बऱ्हाणपूर-अंकलेश्वर राष्ट्रीय महामार्गावर सावेर गावाच्या फाट्याजवळ आज सायंकाळी ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिली. त्यात एकाचा मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले. हा अपघात सावेर फाट्यावरील पेट्रोल पंपाजवळ घडला. अपघातानंतर फरार होण्याच्या प्रयत्नात असलेल्या ट्रकचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चोपड्याकडून शिरपूरच्या दिशेने जाणाऱ्या ट्रकने (पान ४ वर)




आमचे लाडके नेते, माजी मंत्री
आ.अमरिशभाई पटेल
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

दि शिरपूर पिपल्स को-ऑप.बँक लि.शिरपूर

अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज ३६५ दिवस बँकींग सेवा देणारी एकमेव सहकारी बँक
शाखा : शिरपूर : सोमवार ते शुक्रवार सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत
शनिवार, रविवार व सार्वजनिक सुटीच्या दिवशी सकाळी ९ ते दुपारी ३ पर्यंत
शाखा : धुळे, जळगाव, नाशिक, चोपडा, अमळनेर, भुसावळ व शहादा
सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते सायं. ६वाजेपर्यंत
सर्व शाखा : शनिवार, रविवार व सार्वजनिक सुटीच्या दिवशी सकाळी १० ते दुपारी ३ पर्यंत


मा.राजगोपाल भंडारी
मा.श्री.योगेश भंडारी (अध्यक्ष)
मा.श्री.श्रेणिक जैन (उपाध्यक्ष)

संचालक मंडळ
मा.श्री.भुपेश अग्रवाल, मा.श्री.संजय चौधरी, मा.श्री.बाबुलाल महाजन, मा.श्री.दिलीप पटेल
मा.श्री.जितेंद्र पोतदार, मा.श्री.संजय सुराणा, मा.सौ.वैशाली पाटील, मा.सौ.कल्पना राजपूत
मा.श्री.मोतीलाल माळी, मा.श्री.कमलेश अग्रवाल, मा.श्री.बिपीन तेले, मा.श्री.गणेश साळुंखे
मा.श्री.सी.ए.अतुल पटवारी (तज्ञ संचालक) मा.श्री.डॉ.लक्ष्मीकांत शर्मा (तज्ञ संचालक)
मा.श्री.बी.जे.पाटील (मुख्य कार्यकारी अधिकारी)

मोबाईल बँकींग | UPI | Aadhar Base - DBT

कर्ज सुविधा : सोलर,इलेक्ट्रीक वाहन, सोने तारण, वाहन, मुदती, गृह बांधणी, पगार तारण, प्रॉपर्टी अगेन्स लोन, बिल्डर्स, कन्झुमर, सुक्ष्म व लघुउद्योग, वेअर हाऊस, व्यापारी कर्ज-कॅश क्रेडीट/हायपोथिकेशन, एनसीएस/केव्हीपी/एलआयसी तारणावर

अतिशय माफक दरावर कर्ज सुविधा उपलब्ध
कर्ज टेकओव्हरसाठी कोणतेही चार्जेस व मॉर्गेजचा खर्च नाही, कर्ज प्रकरणाला त्वरीत मंजूरी

शिरपूर-महाराजा कॉम्प्लेक्स, मेनरोड,शिरपूर जि.धुळे, फोन- ०२५६३-२५७१७३, २९५२७१
धुळे-१२४७/अ, भटस्मृती शेजारी,खोलगल्ली, धुळे फोन : ०२५६२-२८०७८५, २८०५८५
जळगाव- प्लॉट नं.२, जीएस ग्राऊंड शेजारी, विसनजी नगर,जळगाव फोन : ०२५७-२२२७२३६
नाशिक-३/४, श्री गुरूदेव टॉवर, वसंत मार्केट समोर, गंगापूर-शरणपूर लिंक रोड, कॅनडा कॉर्नर, नाशिक, ०२५३-२३११४०९
अमळनेर- मुख्य पोस्ट ऑफीस समोर,अमळनेर, जि.जळगाव, फोन :०२५८७-२२२१७३
चोपडा-मेनरोड, चोपडा जि.जळगाव, फोन : ०२५८६-२२०२७७
भुसावळ - भागाई कॉम्प्लेक्स, दु.नं.१ ब, चंदन मेडिकल जवळ,जामनेर रोड,भुसावळ, फोन : ०२५८२-२२७०२२
शहादा : दु.नं.१,२,३,पुरूषोत्तम मार्केट,बस स्टॅण्ड समोर, शहादा जि.नंदुरबार, फो : ०२५६५-२२३१७३



दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,39,700 रु.+3% GST
सोने- 24 K -1,52,000 रु.+3% GST
चांदी- 2,34,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



धुळे जिल्ह्याचे पाणीदार नेते व आमचे मार्गदर्शक
आदरणीय
आ.अमरिशभाई पटेल
यांना वाढदिवसाच्या अनंत कोटी शुभेच्छा!


आ. भाईसाहेब अमरीशजी पटेल

प्रेरणास्थान

मा बापूसो. शिवाजीराव दहिते
मा. अध्यक्ष जि. प. (धुळे)

मार्गदर्शक

मा. भूपेशभाई पटेल
मा. नगराध्यक्ष शिरपूर नगपपालिका, शिरपूर

-: शुभेच्छूक :-


मा. हर्षवर्धन दहिते
मा. सभापती कृषी व पशुसंवर्धन जि.प.धुळे
संचालक- धुळे व नंदुरबार जिल्हा मध्य.सह.बँक धुळे


मा. बाबासो सचिन दहिते
उद्योजक. धुळे


जयदादा दहिते
युवा उद्योजक. धुळे

# कुप्रसिद्ध इराणी गँगचा मेंबरला पत्नीसह शिरपूर शहर पोलिसांनी केले गजाआड

**शिरपूर दि.१३ (का.प्र.)- मंगळसूत्र चोरीबद्दल संपूर्ण राज्यात कुप्रसिद्ध असलेल्या भुसावळ येथील इराणी गँगच्या सदस्यासह त्याच्या पतकीला शिरपूर शहरातील एका चेन स्नॅचिंगच्या गुन्ह्यात शहर पोलिसांनी अटक केली. त्यांच्या अटकमुळे राज्यभरातील अनेक पोलिस ठाण्यातील गुन्हे उघडकीस आले आहेत. सराईत गुन्हेगाराला शहर पोलिसांनी शिताफीने अटक केली. आशू तथा हसन अली नियाज अली इराणी (वय २४, रा.पापा नगर, भुसावळ) व त्याची पतकी फातिमा इराणी (वय २१) अशी संशयितांची नावे असून पोलिसांनी त्यांच्याकडून ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने (लगडी) जप्त केले.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २४ जुलैला रात्री साडेआठला येथील हिरा नगर परिसरातील रहिवासी मीना कैलास अग्रवाल (वय ६१) व मीराबाई आसाराम धनगर पायी जात असतांना दोन संशयितांनी त्यांच्या गळ्यातील अनुक्रमे ८ ग्रॅम आणि ७ ग्रॅम वजनाची सोन्याची मंगलपोत हिसकावून पळ काढला होता. शिरपूर शहर पोलीस ठाण्यात त्यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करतांना शहर पोलिसांच्या पथकाने मुक्ताईनगर तालुक्यातील हरताळा येथील बिस्मिल्ला हॉटेलमधून हसन इराणी याला ताब्यात घेतले. या गुन्ह्यातील साथीदार सादिक अली इराणी अपघातात जखमी झाल्याने रुग्णालयात उपचार घेत असल्याचे आढळले. हसन इराणी याने चोरी केलेली मंगलपोत पतकी फातिमा इराणी हिच्याकडे दिल्याचे सांगितले. पोलिसांनी भुसावळ येथील मुस्लिम कॉलनीतून फातिमा हिला ताब्यात घेतले. तिने भुसावळ येथील व्यापारी ओम जयबहादूर ठाकूर याला विकल्याचे सांगितले. सराफाकडून एकूण ७५ हजार रुपये किमतीच्या ३० ग्रॅम वजनाच्या ३ सोन्याच्या लगडी जप्त केल्या.

संशयित हसन इराणी अट्टल गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध विविध जिल्ह्यांत जबरी चोरी, आर्म्स ॲक्ट आणि मारहाणीचे तब्बल २६ गंभीर गुन्हे दाखल आहेत.पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलिस निरीक्षक किशोरकुमार परदेशी, उपनिरीक्षक जितेंद्र महाजन, हवालदार रवींद्र आखडमल, अतुल पाटील, आरीफ तडवी, सचिन वाघ, गोविंद कोळी, मनोज महाजन, योगेश दाभाडे, विनोद आखडमल, भटू साळुंके, मनोज दाभाडे, प्रशांत पवार, सोमा ठाकरे आणि निलेश चौधरी यांच्या पथकाने ही कामगिरी बजावली.

# कृऊबाच्या माध्यमातून गतीमान कामामुळे व्यापाऱ्यांमध्ये समाधान; सभापती अभिजीत पाटलांनी साधला संवाद



**शहादा, दि.१३ (प्रतिनिधी)- येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकासकामांमुळे तसेच पारदर्शक आणि गतिमान कामकाजामुळे व्यापारी वर्गामध्ये समाधानाचे वातावरण असल्याचे चित्र आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा शहादा नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी संचालक मंडळासमवेत भुवाल ट्रेडर्स येथे सदिच्छा भेट देऊन व्यापाऱ्यांशी संवाद साधला.**

या भेटीदरम्यान बाजार समितीच्या मार्केट यार्ड आवारातील विविध विकासकामे, पायाभूत सुविधा तसेच व्यापाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत चर्चा करण्यात आली. बाजार समितीच्या कामकाजाचा आणि भविष्यातील विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या बाबींचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला. बाजार समितीच्या माध्यमातून मार्केट यार्ड परिसराचा विकास, व्यापारी व शेतकरी यांच्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, कामकाजात पारदर्शकता राखणे आणि विविध प्रश्नांवर सकारात्मक पद्धतीने मार्ग काढण्याचा प्रयतक सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी बाजार समितीचे उपसभापती सत्यानंद पाटील, संचालक दगडू पाटील, संचालक मंडळातील सदस्य तसेच प्रमुख व्यापारी चंद्रकांत कोटडीया, मोहनशेठ अग्रवाल, अजय छाजेड, निलेश छाजेड यांच्यासह मोठ्या संख्येने व्यापारी बांधव उपस्थित होते.

बाजार समितीच्या सध्याच्या कामकाजाबाबत व्यापाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. बाजार समितीच्या आवारात सुरू असलेल्या विकासकामांमुळे पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होत असून, कामकाज अधिक गतिमान व पारदर्शक होत असल्याचे व्यापाऱ्यांनी नमूद केले. सभापती अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाखाली बाजार समितीच्या विकासासाठी सुरू असलेल्या प्रयतकांचे व्यापाऱ्यांनी विशेष कौतुक केले. शेतकरी, व्यापारी आणि बाजार समिती प्रशासन यांच्यात समन्वय राहिल्यास बाजार समितीच्या विकासाला आणखी गती मिळेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी व्यापाऱ्यांच्या अडचणी आणि अपेक्षा जाणून घेऊन त्यावर सकारात्मक कार्यवाही करण्याचा प्रयत्न राहील असे अभिजीत पाटील यांनी सांगितले.

# गुलमोहर रेस्ट हाऊस जवळ एकाला मारहाण

**धुळे, दि.१३- येथील गुलमोहर शासकीय विश्रामगृहात रूम खाली नसल्याचे सांगितल्यावरून चार ते पाच जणांनी एकाला मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.**

गुलमोहर शासकिय विश्राम गृहाचे प्रवेशव्दाराजवळ बुधवारी (ता.९) मध्यरात्री चार ते पाच जण आले. त्यांनी विश्रामगृहात रूम असल्याबाबत विचारणा केली. परंतु विश्रामगृहातील रतिलाल पंडित यांनी रूम खाली नाही, त्यामुळे देऊ शकत नसल्याचे सांगितले, त्याचा राग आल्याने संशयित नंदु बेलमामेरा, अफजल फारुक पुर्ण नाव गांव माहीत नाही व तयाचे सोबत इतर ४ ते ५ अनोळखी जण यांनी पंडित यांना हाताबुक्यांनी कानशिला चेहऱ्यावर पोटावर, पाठीवर मारहाण करुन शिवीगाळ करुन ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी धुळे शहर पोलीस ठाण्यात शुक्रवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल झाला. निरीक्षक हेमंत कुमार भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार एस एन ठाकुर तपास करीत आहेत.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

# पीएच.डी.पदवी प्राप्त केल्याबद्दल डॉ. जुबेर काझींचा सत्कार संपन्न



**धुळे, दि.१३- बझ्म-ए-इकबाल, धुळे यांच्या वतीने स्कूल क्रमांक ४, बारा पत्थर, धुळे येथे माननीय डॉ. जुबेर अख्तर काझी यांना उच्च शैक्षणिक व संशोधनात्मक पीएच.डी. पदवी प्राप्त झाल्याबद्दल त्यांच्या सन्मानार्थ एक भव्य शैक्षणिक व साहित्यिक सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.**

कार्यक्रमाची सुरुवात कुरआन पठण व नात-ए-शरीफने झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. खलील युनूस अन्सारी यांनी भुषवले. या कार्यक्रमाला शहरातील अनेक मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या. यामध्ये विद्वान, पीएच.डी. धारक, शिक्षक, वकील, पत्रकार, साहित्यिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच सत्कारमूर्ती डॉ. जुबेर अख्तर काझी यांचे नातेवाईक व मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात उर्दू आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये सत्कारपत्र (सन्मानपत्र) सादर करण्यात आले. प्रसिद्ध कवी उमर फारूक इकबाल धुळेवी यांनी उर्दूमध्ये काव्यरूप सत्कारपत्र सादर केले. तर कुशल व गुणी शिक्षक अब्दुल हफीझ (अँग्लो स्कूल) यांनी स्वतः लिहिलेले इंग्रजी भाषेतील सत्कारपत्र अत्यंत सुंदर व प्रभावी पद्धतीने वाचून दाखवले. त्यांच्या या सादरीकरणाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. यानंतर सलीम अख्तर, इस्माईल शाद, अरबाब आरिज आणि जावेद हुसेन जावेद यांनी मनोगत व्यक्त केले. शकीब यांनी सत्कारमूर्ती डॉ. जुबेर अख्तर काझी तसेच उपस्थित सर्व मान्यवरांना मिठाई वाटून आनंद व प्रेम व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. खलील युनूस अन्सारी यांनी शिक्षण आणि संशोधनाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या शैक्षणिक व साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन समाजासाठी अत्यंत आवश्यक आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शोएब यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बझ्म-ए-इकबालचे पदाधिकारी अब्दुलअजीज अन्सारी, जावेद हुसेन जावेद, शहाबुद्दीन शेख, अब्दुल हफीझ सर तसेच इतर सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## चौकशी जाहीर नोटीस

जा.क्र./जे.१/१११९/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
तरुणसागर अपार्टमेंट, जैन दादावाडी
नंदुरबार ४२४४१६
दि. ०९/०९/२०२६

**चौकशी अर्ज क्र.** : २०७/२०२६ कलम २२
**सार्वजनिक न्यासाचे नांव** :- लेवा पाटीदार बोर्डींग शहादा ता. जि. नंदुरबार
नोंदणी क्रमांक : ए -६५/ धुळे
**अर्जदार** : अभिजित मोतीलाल पाटील

सर्व संबंधित लोकांस या चौकशी जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मा. सहायक धर्मदाय आयुक्त, नंदुरबार विभाग नंदुरबार हे वर नमूद केलेल्या चौकशी अर्ज क्र. २०७/२०२६ नोंदणी क्रमांक ए-६५/धुळे न्यासाच्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मिळकत : (वर्णन) काही नाही.

ब) स्थावर मिळकत : (वर्णन)

मौजे शहादे येथील शहादे म्युनिसिपल हद्दीतील सीटी सर्व्हे हद्दीतील जि. नंदुरबार तालुका पंचायत समिती शहादा पैकी शहादा शहर हद्दीतील बिनशेती सर्व्हे नंबर -२३६/१ब क्षेत्रफळ : ००.४४.५२ हे. आर. चौ. मी.

याबाबत सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा द्यावयाचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून ३० दिवसांचे आत या कार्यालयात दाखल करावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणाचे काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश पारीत केले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मदाय आयुक्त, नंदुरबार विभाग नंदुरबार यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०९/०९/२०२६ रोजी दिली.

सही...
**(दे.स. चौरंगे)**
**अधिक्षक (न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नंदुरबार विभाग नंदुबार

शिक्का

## टायटल व्हेरिफिकेशन नाटीस व जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व हितसंबंधितांना तसेच सर्व बँका, पतपेढ्या तथा इतर सर्व वित्तीय संस्थांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** तु. जि. धुळे, पो. तु. ता. धुळे पैकी जिल्हा परिषद धुळे व तालुका पंचायत समिती धुळे अंतर्गत **मौजे धुळे येथील सर्व्हे क्रमांक ४९५/२-४ पैकी प्लॉट क्र. १२ चे क्षेत्र ३३९३.६५ यांसी सिटी सर्व्हे क्रमांक १०३७६/२/१२ चे क्षेत्र ३३९३.६५** बखळ प्लॉट मिळकत यांसी चतु:सिमा खालील प्रमाणे.

**पुर्वेस : ९ मीटर रोड** **पश्चिमेस : ओपन स्पेस**
**दक्षिणेस : प्लॉट क्रमांक १३ व १४** **उत्तरेस : सिटीएस १०३७५**

येणे प्रमाणे वर्णनाची मिळकतही **श्री. दिनेश भटूलाल शर्मा** रा. धुळे यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील असून सिटी सर्व्हे अभिलेखातील मालमत्ता पत्रकावर सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार म्हणून वर नमूद मिळकतधारक यांचे नांव मालक व कब्जेदार सदरी लागलेले आहे. तसेच संबंधित मिळकतधारक यांनी सदर मिळकत कोणत्याही प्रकारच्या वाद, दावा, तारण, बोजा, न्यायालयीन प्रतिबंध, तृतीय पक्षाचा हक्क किंवा इतर कोणत्याही कायदेशीर अडचणींपासून पूर्णपणे मुक्त, निर्वेध, निर्विवाद व निजोखमी असल्याचा भरवसा आमच्या पक्षकारांना दिलेला आहे. त्यामुळे आमच्या पक्षकारांनी सदर मिळकत खरेदी करण्याबाबत सदर मिळकतधारकांशी व्यवहाराची बोलणी सुरु केली असून, मिळकत खरेदी बाबत पुढील व्यवहार निश्चित करण्यात येणार आहे.

सबब सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक, पतसंस्था, वित्तीय संस्था, कंपनी किंवा इतर कोणत्याही पक्षाचा कोणत्याही स्वरुपाचा मालकी हक्क, सहहक्क, हितसंबंध, ताबा, कब्जा, वहिवाटीचा हक्क, वारसा हक्क, उत्तराधिकाराचा हक्क, मृत्युपत्राद्वारे प्राप्त हक्क, कौटुंबिक तजवीज, हिंदू अविभक्त कुटुंबाचा (HUF) हक्क, भाडेकरार, भाडेपट्टा, परवाना विक्री, विक्री खत, हस्तांतरण, अभिहस्तांतरण अदलाबदल, देणगी, बक्षीस, गहाण, तारण, कर्ज किंवा इतर कोणताही बोजा, प्रभार (Charge) धारणाधिकार (Lien) सुविधाधिकार (Easement) न्यास/विश्वस्त हक्क, विकास कारारनामा, मुखत्यारपत्र, करार, जप्ती, न्यायालयीन आदेश किंवा हुकूमनामा, शासकीय अथवा निमशासकीय आरक्षण, अधिग्रहण, प्रतिबंध, दायित्व किंवा अन्य कोणताही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हक्क, दावा, मागणी किंवा स्वारस्य असल्यास, अथवा सदर मिळकतीच्या संपूर्ण किंवा कोणत्याही भागावर तृतीय पक्षाचा कोणत्याही स्वरुपाचा हक्क किंवा हितसंबंध असल्यास, संबंधित व्यक्ती/संस्था यांनी त्याबाबतची लेखी हरकत, आक्षेप किंवा दावा, त्यांच्या पुष्ट्यर्थ उपलब्ध कागदपत्रांच्या प्रतींसह ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर सादर करावा.

सदर मुदतीत कोणाचीही आक्षेप/हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध व बोजा विरहीत, हस्तांतरणीय आहे असे समजून आजही पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या तसेच वर्तमानपत्रात परस्पर प्रसिद्ध केलेल्या तसेच कागदपत्रांशिवाय आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. तसेच आमच्या पक्षकार यांनी सदर व्यवहार पूर्ण केल्यावर आलेल्या हरकती आमच्या पक्षकार यांच्यावर बंधनकारक राहणार नाहीत.

सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन तसेच दाखवलेल्या कागदपत्रावरुन प्रसिद्ध करण्यात येत आहे.

कळावे, ही जाहीर नोटीस, धुळे दि. १३/०९/२०२६

**ॲड. विशाल शरद भट** मो. ९३२६१९८१७९
कार्यालय : ३८ जानकी नगर, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** : १) मौजे हिसपूर ता. शिंदखेडा जि. धुळे येथील गट क्र. व उपविभाग १५४/१ चे ला. ला. १ ते ६० पो. ख. ०० हे. ०० आर असे एकूण क्षेत्र १ हे. ६० आर चा आकार १० रु. ०० पैसे ची जिरायत शेत जमीन अशी मिळकत यास वहीवाटी प्रमाणे वापर व रस्ता राहील.

२) मौजे हिसपूर ता. शिंदखेडा जि. धुळे येथील गट क्र. व उपविभाग १५४/२ चे ला. ला. १ हे. ६० पो. ख. ०० हे. ०० आर असे एकूण क्षेत्र १ हे. ६० आर चा आकार १० रु. ०० पैसे ची जिरायत शेत जमीन अशी मिळकत यास वहिवाटीप्रमाणे वापर व रस्ता राहील.

यासी दोन्ही गट एकमेकांस लागन असल्याने एकत्रित चतु:सिमा
पुर्वेस :गट नं.१५५, १५६, १५७, १५८
पश्चिमेस : गट नं. १५३
दक्षिणेस : गट नं. १४३
उत्तरेस : गट नं. १५३

येणे प्रमाणे वरील वर्णनाची आतील दोन्ही मिळकती ही **१) दिपकराज नामदेव पाटील, २) प्रमिला मनोहर पाटील, ३) मनिषा धर्मराज पाटील, ४) वैशाली प्रेमराज पाटल, ५) विजया अजितराव कुंवर, ६) जोत्सना नंदकुमार पाटील मराठे** सर्व रा. हिसपूर ता. शिंदखेडा जि. धुळे यांच्या संयुक्त मालकीच्या व ताबे उपभोगातील असून त्यांचा कडून सदर मिळकती या आमचे अशिलांनी कायम स्वरुपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदापोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणाचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण, टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवू प्रत्यक्ष भेटून शहानिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्बोज, निर्वेध व वरील नमूद दोन्ही मिळकती या संयुक्त मालकीची असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींचा अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. व परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरी बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १२/०९/२०२६

**ॲड. ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवाला बिल्डींग जवळ, मिल परिसर, धुळे
मो. ९४२२७७१२७४

## प्रकाश में आज आतीश




संजय दत्त


धुळे जिल्ह्याचे पाणीदार नेते

आदरणीय

आ.अमरिशभाई पटेल

यांना वाढदिवसाच्या अनंत कोटी शुभेच्छा!







आ. भाईसाहेब अमरीशजी पटेल

सदस्य- विधान परिषद, महाराष्ट्र राज्य

—: शुभेच्छूक :—





श्री. विजय एम. भोसले
अध्यक्ष
साक्री ता. मराठी पत्रकार समन्वय समिती साक्री (धुळे)

सौ.उज्वला विजय भोसले
मा. उपनगराध्यक्षा
साक्री नगर पंचायत साक्री

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता. १२ से रोज १ खेल टा. १२ बजे

हैवान (हिंदी)

bookmyshow

9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता. १२ से रोज ३ खेल टा. ३,६,९ बजे

हनुमानअंश (हिंदी)

bookmyshow

9422789999/9823177599 Jyoticinemadhule.









संस्थापक अध्यक्ष



माजी शालेय शिक्षणमंत्री

आ.अमरिशभाई पटेल

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !



गुणवत्तापूर्ण शिक्षणाची कास धरणारी व अल्पावधीत गरूडझेप घेणारी, राज्य शासनाचा उत्कृष्ट शैक्षणिक संस्था हा पुरस्कार मिळविणारी उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था

शिरपूर एज्युकेशन सोसायटी
आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट,शिरपूर

* संचालक मंडळ *

मा.श्री.अमरिशभाई रसिकलाल पटेल (संस्थापक अध्यक्ष)
मा.श्री.भुपेशभाई रसिकलाल पटेल (अध्यक्ष)
मा.श्री.राजगोपाल चंदुलाल भंडारी (कार्याध्यक्ष)
मा.श्री.कमलकिशोर किसनलाल भंडारी (कार्याध्यक्ष)
मा.श्री.चिंतनभाई अमरिशभाई पटेल (कोषाध्यक्ष)

सर्व सन्माननीय संचालक मंडळ

- श्री विलेपार्ले केळवाणी मंडळ,मुंबई
- दि शिरपूर एज्युकेशन सोसायटी,शिरपूर
- मुकेशभाई आर.पटेल बॉईज ॲण्ड गर्ल्स मिलीटरी स्कुल ॲण्ड ज्युनि. कॉलेज (सायन्स), तांडे ता.शिरपूर
- मुकेशभाई आर.पटेल स्कुल (सीबीएसई) तांडे ता.शिरपूर

# शिक्षण गंगोत्रीचा महर्षि भगिरथ...अमरीभाई

भक्ताने देवाकडे जावे हा प्रोटोकॉल असला, तरी तो मोडुन जेंव्हा देवच साक्षात भक्ताला भेटायला येतो, ती गोष्ट विशेष असते. शिक्षणासाठी मैलोमैली पायपीठ करणाऱ्या आम्हा शाळकरी मुलांच्या वेदना आम्हालाच माहिती आहेत. शिक्षणाची ओढ असल्याने अनवाणी पायाने आम्ही ८/१० मैल चालत शाळेत जायचो. पायाला खडे, काटे टुचायचे. कडक ऊन्हात ते पोळायचे, परंतु शिक्षण हे वाघिणीचे दुध असते हा शाळेतला सुविचार आम्हाला आठवायचा. ते दुध पिण्यासाठी आम्ही जिद्दीने जायचो, यायचो. त्या वेदना भोगल्या असल्याने आजच्या भाग्यशाली लेकरांना जेंव्हा दारातच शाळा ऊपलब्ध आहेत हे पाहुन आम्हाला हेवा वाटतो. केजी ते पीजी मराठी ते ईंग्रजी बालमंदिर ते डी.एड, बी.एड, ईंजीनियरींग, नर्सिंग, वैद्यकीय, कृषी, कला, वाणिज्य, विज्ञान, फार्मसी अशी विविध महाविद्यालये अगदी हाकेच्या अंतरावर ऊपलब्ध आहेत. सरस्वती देवीला भेटणेसाठी धावणाऱ्या आम्हा लोकांना, जेंव्हा ही सरस्वती देवीच साक्षात दारी येते, हे पाहुन आश्चर्य तर वाटणारच! ही किमया केली आहे ती अमरीशभाई पटेल नावाच्या माणसाने!



शिक्षणाचे साम्राज्य ऊभे करणाऱ्या भाईंना कुणी सम्राट म्हणतो तर कुणी महर्षी. पुर्वीच्या ऋषींना आपण पाहीले नाही, परंतु राजा भगिरथ सारखी कठोर तपश्चर्या करुन शिक्षणाची ही गंगोत्री भाईंनी अवतरलेली आहे. ती नुसतीच ऊभारलेली नाहीत, तर अत्याधुनिकतेने सजवलेली आहेत. भाई नक्की कोण आहेत हो? हा माझाच मला पडलेला प्रश्न आहे. विकासपुरुष, जलपुरुष, दूरदृष्टीचा द्रष्टा, माणुसकीचा पाझर, समाजसेवक, राजकारणी, समाजकारणी की अजुन काही? यासाठी बऱ्याच वेळा मी त्यांच्या प्रकल्पांना पाहायला जातो. आम्ही भाईच्या दरबारात नसतोच कधी. परंतु निरपेक्ष भावनेने, कुठल्याही सत्ता संपत्तीचा, मान सन्मानाचा मोह नसलेली व दुरुनच मनापासुन प्रेम करणारी माणसं आहोत, भ्रामक स्तुती वा ऊगाचचे नक्राश्रु ढाळणारे नाही. त्यामुळे भाई नक्की कोण आहेत? या प्रश्नाचे नीरक्षिर वृत्तीने उत्तर शोधत असतो. चार आंधळ्यांच्या गोष्टी सारखं भाई केवळ एवढेच नाही आहेत, भाईंची विविध रूपे आहेत, सर्वच रुपे सर्वांना ज्ञात असतीलच असे नाही. भाई हे अनेक रुपातले मल्टीपल पर्सनॅलीटी आहेत. त्या पलीकडे हा माणुस अजुन वेगळा आहे. समुद्रातले हिमनग एक अष्टमांश जगाला दिसतात, पण क्षितिजापलीकडले विश्व अजुनही मनमोहक असते तसेच भाईंच्या कर्तृत्वाचा डोंगर मोठ्ठा आहे.

भाई वर्षांच्या पुढचे पाहतात, असं म्हणतात त्याच धर्तीवर मी म्हणतो की भाईंचे कार्य पुढच्या कैक जेन अल्फा जेन बीटा या पिढ्यांसाठी प्रेरणादाई असणार आहेत. या अदृश्य गोष्टी आहेत, या को-प्रोडक्ट आहेत, कदाचित आपल्या कार्यात व्यस्त असणाऱ्या भाईंनाही त्यांची जाणीव नसावी. फुलांच्या सुंगधांना कुठे माहीत असते की त्यांच्या सुंगधांनी किती लोकं सुगंधीत होताहेत ते. मधाला कुठे माहीत असते की त्याच्याच किती व्हिटॅमिन्स, प्रोटीन्स असतात ते. त्याचा कसा, किती, कुठे व केंव्हा काय फायदा होईल हे फुलाला व मधाला कळत नाही. ईतकच कशाला हो ? ते फक्त आपला सुगंध वाटण्यात व अमृतासारखा गोडवा देण्यातच गुंग असतात. भाईच स्वतः एक शाळा आहेत, विद्यापीठ आहेत. त्यांच्या वागण्यातुन. बोलण्यातुन, कृतीतून ही खुप काही शिकायला मिळते. जगाला साम्राज्य दिसते पण ते ऊभारणेसाठी सम्राटाला काय पापड बेलावे लागतात हे जावे त्याच्या वंशा तेंव्हा कळे अशी गोष्ट असते.

या शिक्षण साम्राज्यामुळे खेडच्या पाड्यातील, आदिवाशी भागातील, गोरगरीबांची झोपडपट्टीतली मुले जेंव्हा अपटु डेट कपड्यात वावरतांना व छानपैकी ईंग्रजी बोलतांना पाहतो तेंव्हा मी भाईंना नमन करतो. ऊंचच ऊंच ईमारती, प्रशस्त पटांगणे, भव्यं वर्गखोल्या, सुसज्ज लॅब्ज्स, पुस्तकांनी भरलेली वाचनालये, डिजीटल रूम्स, जीम्स्, सभामंडपे, त्यात वाहणारी शिक्षणाची गंगा, ती शिस्त, तो नेटकेपणा हे सर्व पाहतो तेंव्हा भाईंना नमन करतो. आम्ही कामगार क्षेत्रातली माणसं, मोडेन पण वाकणार नाही असे स्वत्व बाळगणारी स्वयंभु मंडळी आहोत, परंतु जेथे दिव्यत्वाची प्रचिती येते तेथे माथा टेकलेशिवाय राहत नाही. या मुळेच अवघ्या महाराष्ट्रात शिक्षणाच्या हब मुळे शिरपुर चे नाव ललामभुत ठरले आहे, यामुळेच नुसत्या महाराष्टातुनच नव्हे तर भारतभरातुन विद्यार्थी येथे येतात. त्यांच्या निवास व भोजनच्या व्यवस्थेत कित्तीतरी लोकांना रोजगार मिळतो आहे. भाड्याची घरे, भोजनालये, लाँड्री, शिवणकाम, रिक्षा व्यवसाय, ऊपहारगृहे अशा क्षेत्रात खुप हातांना काम मिळाले आहे. शिरपुरचे नाव, वैभव, संस्कार, संस्कृती, भाषा सर्वदूर परीचीत होते. शिक्षणाच्या गंगेच्या काठाकाठाने फुलत जाणारे हे वैभवच आहे, त्याला नमन आहे.

एवढे साम्राज्य ऊभे करणे हे येरागबाळ्याचे काम नोहे, तेथे पाहिजे अफाट आत्मविश्वास प्रचंड जिद्द निर्मळ ध्यास अविरत सातत्य दुर्दम्य आशावाद व अत्यंत महत्वाचे म्हणजे संस्कारांचे अधिष्ठान, नवीन पिढीला भाई म्हणजे दीपस्तंभ आहेत. एवढे ऐश्वर्य असुनही नम्रता आहे, अजुनही या वयात कार्य करण्याचा उत्साह आहे. गौरगरीबांच्या व्यथा ऐकुन मदत करण्याची माणुसकी आहे. शरीराला जे पचणार नाही असे तेलकट, तुपकट, तर्रीवाले, तिखट, मसालेदार, ऊघड्यावरचे पिझ्झा बर्गर, नुडल्स, मॅगी असे आर्कर बर्कर ते खात नाहीत. कुठलेही व्यसनाच्या आधीन नाहीत. आई वडीलांच्या फोटोचा नमस्कार केलेशिवाय बाहेर पडत नाहीत. जिज्ञासु वृत्तीने नवनवीन ज्ञान आत्मसात करतात. देशविदेशातले जे जे ऊन्नत्त ऊदात पाहतात तेच शिरपुर मध्ये असावे असं ठरवतात व ते साक्षात ऊभारतातही. त्यामुळे एका माणसातली ही माणुसकी, हे मोठेपण, ही शालीनता व मऊ मेणहाहुनि आम्ही विष्णुदास कठीण वज्रास भेदु ऐसे अशी ही शिकवण मिळते, भलेचि देवु कांसेची लंगोटी नाठाळाच्या माथी हानु काठी असा ही धडा शिकायला मिळतो.

भाईंच्या चौफेर विकासात त्यांच्या या कुटुंब वत्सल स्वभावाचे संस्कार नवीन पिढीसाठी अनुकरणीय आहेत. सदैव शिरपुरला सिंगापुर करण्याचे स्वप्न पाहणारे ते महर्षी आहेत म्हणुनच त्यांच्या सहधर्मचारीणी जयश्रीबेन म्हणतात ऊनके दिलमें सदा शिरपुर रहता है असा मनापासुन काम करणारा माणुस, संस्कारक्षम पालक, दुरदृष्टीचा नेता, सर्वांना एका धाग्यात गुंफणारे नेतृत्व व प्रत्येकाला आपलासा व हवाहवासा वाटणारा मित्र, पाणी रे पाणी तेरा रंग कैसा असं सर्वसमावेशक जगणारा माणुस म्हणुन भाई मला भावतात अशा या गोड माणसास



एम.के. भामरे

वाढदिवसानिमित्त अमृत महोत्सवी माझ्या लक्ष लक्ष शुभकामना































## पान १ वरुन

### मलेशिया पंतप्रधानांसोबत राहुल गांधींची ब्रेकफास्ट पे चर्चा

विरोधी पक्षनेते होते. या भेटीनंतर इब्राहिम यांनी गांधी कुटुंबाला आपले कौटुंबिक मित्र असल्याचे म्हटले होते. किशोर कुमार यांचे गाणे गायले दोन दिवसीय ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी अन्वर इब्राहिम भारतात आले आहेत. शनिवारी त्यांनी समावेशक जागतिक प्रशासन आणि बहुपक्षीयता मजबूत करणे या विषयावरील सत्रात सहभाग घेतला. त्यानंतर त्यांनी नवी दिल्लीत ब्रिक्स नेत्यांसोबत वृक्षारोपण कार्यक्रमातही सहभाग घेतला. शनिवारी सायंकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयोजित केलेल्या स्नेहभोजनालाही इब्राहिम उपस्थित होते. यावेळी त्यांनी पियानोच्या साथीने ज्येष्ठ गायक किशोर कुमार यांचे प्रसिद्ध ख्वाब हो तुम या कोई हकीकत... हे गाणे सादर केले.

अकरा देशांचे नेते ब्रिक्स परिषदेत

ब्रिक्स शिखर परिषदेत रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासह ११ देशांचे नेते सहभागी झाले आहेत. काल (दि.१२) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत मंडपम येथे सहभागी देशांच्या नेत्यांचे स्वागत केले. भारताला भेट देणाऱ्या परदेशी नेत्यांमध्ये मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम, सौदी अरेबियाचे परराष्ट्र मंत्री प्रिन्स फैसल बिन फरहान अल सौद, व्हिएतनामचे पंतप्रधान ले मिन्ह हंग, बुरुंडीचे राष्ट्राध्यक्ष एव्हॅरिस्ट नदायिशिमिये, कझाकस्तानचे राष्ट्राध्यक्ष कासिम-जोमार्ट टोकायेव आणि युगांडाच्या उपराष्ट्राध्यक्ष जेसिका अलुपो यांचा समावेश आहे.

### दिवाळीपूर्वी रेशनकार्डावर स्वस्त दरात शिधा मिळणार

डाळ आणि खाद्यतेल बाजारभावापेक्षा कमी दरात देण्याचा पर्याय सरकारकडून विचाराधीन आहे. यासाठी आसाम सरकारने राबविलेल्या अनुदानित दराच्या योजनेचा अभ्यास महाराष्ट्रातील अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून सुरू आहे. आसाममध्ये डाळ, साखर आणि मीठ अनुदानित दरात उपलब्ध करून दिले जाते. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात दिवाळीपूर्वी योजना कशी राबविता येईल, याचा अभ्यास केला जात आहे. मात्र, या वस्तू नेमक्या किती दराने उपलब्ध करून दिल्या जाणार, याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. बाजारभावापेक्षा किती कमी दरात वस्तू मिळणार, याचेही निश्चित दर अद्याप जाहीर झालेले नाहीत.

एक कोटी ८४ लाख केशरी शिधापत्रिका महाराष्ट्रात सुमारे एक कोटी ८४ लाख २४ हजार केशरी शिधापत्रिकाधारक असल्याची माहिती आहे. शासनाच्या निकषांनुसार पात्र कुटुंबांना केशरी शिधापत्रिकेद्वारे सवलतीच्या दरात ठराविक अन्नधान्याचा लाभ दिला जातो. या कुटुंबांना दिवाळीच्या काळात स्वस्त दरात साखर, डाळ आणि खाद्यतेल उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावामुळे मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

### गणेशोत्सव निमित्त नंदुरबार बाजारपेठेत गर्दी

गल्लीबोळांत असल्याने परराज्यांतून आलेल्या भाविकांना मोठ्या आकाराच्या मूर्ती बाहेर काढताना मोठी कसरत करावी लागली. मोठ्या मूर्ती नेताना मार्गातील विजेच्या तारा लाकडी बांबूच्या सहाय्याने बाजूला साराव्या लागत होत्या. त्यामुळे मूर्ती सुरक्षितपणे वाहनात चढवून नेण्यासाठी भाविकांना विशेष काळजी घ्यावी लागली. गुजरातमध्ये रेल्वे मार्गाने, तर मध्यप्रदेशात राज्य महामार्गाने गणेशमूर्ती रवाना करण्यात आल्या.

स्वस्त, आकर्षक आणि मोठ्या आकाराच्या गणेशमूर्तींसाठी नंदुरबारची बाजारपेठ पेणनंतर महत्त्वाची मानली जाते. येथील गणेशमूर्ती देशातील विविध भागांसह परदेशातही पाठविल्या जातात. महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यप्रदेशातून मोठ्या प्रमाणावर आगाऊ बुकिंग झाल्याने गेल्या अनेक दिवसांपासून मूर्ती घेऊन जाणाऱ्या भाविकांची व वाहनांची वर्दळ शहरात सुरू होती. दरम्यान, गणेश चतुर्थीच्या पूर्वसंध्येला गणेशमूर्तींसोबतच आरास साहित्य, लाईटिंग, सजावटीचे साहित्य आणि पूजेसाठी आवश्यक अन्य साहित्य खरेदी करण्यासाठीही बाजारपेठेत ग्राहकांची मोठी गर्दी झाली. त्यामुळे संपूर्ण शहरात गणेशोत्सवाचा उत्साह आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

### पतसंस्थेचा सभासद हाच खरा मालक

निवड करतात आणि निवडून आलेले संचालक चेअरमनची निवड करतात. त्यामुळे संस्थेच्या कारभारात सभासदांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. यापूर्वीही सभासदांना लाभांशाच्या माध्यमातून विविध भेटवस्तू देण्यात आल्या असून, यंदाही सभासदांना भेटवस्तू देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, पतसंस्थेचे सभासद ओमप्रकाश खंडेलवाल यांची धुळे महानगरपालिकेच्या स्वीकृत नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सभेस संस्थापक चेअरमन सुभाष चोथमल अग्रवाल, चेअरमन राकेश सुभाष अग्रवाल, व्हाईस चेअरमन अजय गोविंदलाल अग्रवाल, सतीश राधाकिसन अग्रवाल, संग रतक दयानंदजी जवरास, अलका रघुनाथ चौधरी, भारती सुनील अग्रवाल, मनीषा राकेश अग्रवाल यांच्यासह संस्थेचे संचालक, पदाधिकारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शहाद्यात भाजपचे माजी शहराध्यक्ष चौधरी

यशवंत चौधरी यांच्यासारख्या अनुभवी आणि जनसंपर्क असलेल्या नेत्याच्या काँग्रेस प्रवेशामुळे शहादा शहरासह संपूर्ण तालुक्यात पक्षाला नवीन ऊर्जा मिळेल, असा विश्वास काँग्रेस नेत्यांनी व्यक्त केला. चौधरी यांचा शहादा शहरात मोठा जनसंपर्क असून भाजप तसेच शिवसेनेतील राजकीय अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. दरम्यान, यशवंत चौधरी यांच्यासोबत त्यांच्या समर्थक आणि कार्यकर्त्यांनीही काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने शहादा तालुक्यात काँग्रेसची संघटनात्मक ताकद वाढण्याची शक्यता आहे. या पक्षप्रवेशाचा आगामी स्थानिक राजकारणावर कितपत परिणाम होतो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. या मेळाव्यास काँग्रेसचे विविध पदाधिकारी, आघाड्यांचे प्रमुख, स्थानिक कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जावा समुद्रात तांत्रिक बिघाड २४० प्रवाशांचे जहाज बेपत्ता

समुद्रात मोठ्या प्रमाणावर शोध आणि बचाव मोहीम सुरू करण्यात आली आहे. बंजारमासिन बचाव संस्थेचे कार्यप्रमुख अरियांतो अर्दी यांनी जहाजाशी संपर्क तुटल्याच्या घटनेला दुजोरा दिला आहे. मदतकार्याला वेग देण्यासाठी तसेच परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी त्रिशक्ती येथे विशेष ऑपरेशन पोस्ट स्थापन करण्यात आली आहे. घटनास्थळी बचाव पथके आणि विविध जहाजे रवाना करण्यात आली असून बेपत्ता जहाजाचा शोध घेऊन प्रवाशांपर्यंत लवकरात लवकर पोहोचणे हे प्रशासनाचे प्रमुख प्राधान्य आहे. दरम्यान, या घटनेत अद्याप कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त समोर आलेले नाही. मात्र, जहाजाशी संपर्क तुटल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात असून बचाव पथकांकडून युद्धपातळीवर शोधमोहीम राबविण्यात येत आहे.

### सावेरच्या अपघातात एक ठार तीन जखमी, चालक अटकेत

पुढे जात असलेल्या नव्या, विनाक्रमांकाच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकीवरील चौघेही गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच जखमींना तातडीने शिरपूर येथील जिल्हा उपरुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीदरम्यान डॉक्टरांनी एकाला मृत घोषित केले. अन्य ३ जखमींवर उपचार सुरू आहेत. दरम्यान, अपघातानंतर ट्रक घेऊन चालकाने घटनास्थळावरून पसार होण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी पाठलाग करून ट्रकसह चालकाला ताब्यात घेतले. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. उशिरापर्यंत मृत व्यक्ती तसेच जखमींची नावे समजू शकली नाहीत.



## भाजपच्या राजा गणपतीचे उत्साहात आगमन पारंपरिक वाद्यांच्या गजरात निघाली मिरवणूक

**धुळे, दि. १३ : भाजपाचा राजा गणेशोत्सव समितीच्या यंदाच्या गणरायाचे रविवारी (दि. १३) सकाळी ११ वाजता श्रीराम मंदिर चौकातून उत्साहपूर्ण वातावरणात आगमन झाले. पारंपरिक वाद्यांच्या गजरात वाजत-गाजत गणरायाची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गणरायाचे जल्लोषात स्वागत केले.**

भाजपाचा राजा गणपतीच्या आगमन सोहळ्यास सकाळी अकराला श्रीराम मंदिर चौकातून सुरुवात झाली. त्यानंतर मनोहर सिनेमागृह, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, चाळीसगाव रोडमार्गे मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीचा समारोप भाजपा जिल्हा कार्यालय येथे झाला. गणरायाच्या आगमनामुळे मिरवणूक मार्गावर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. पारंपरिक वाद्यांच्या तालावर गणेशभक्तांनी जल्लोष केला. ठिकठिकाणी भाविकांनी गणरायाचे दर्शन घेत स्वागत केले. या आगमन सोहळ्यास भाजपाचे ज्येष्ठ नेते विजय पाच्छापूरकर, माजी नगरसेवक हिरामण गवळी, नंदू ठोंबरे, राम अग्रवाल, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, माजी महापौर चंद्रकांत सोनार, माजी उपमहापौर तथा नगरसेविका कल्याणी अंपळकर, नगरसेवक ओमप्रकाश खंडेलवाल, नगरसेविका जयश्री अहिरराव, नगरसेविका निशा महाजन, पवन जाजू, आकाश परदेशी, सागर कोडगीर, प्रथमेश गांधी, बाबा बिरारी, माजी नगरसेवक राजेश पवार, नितीन पाटील, पंकज धात्रक, मोहिनी धात्रक यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणरायाच्या आगमनाने परिसरात भक्तिमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

### अक्कलकुवा येथे घरफोडी दीडलाखांचा ऐवज लंपास

अक्कलकुवा, दि. १३ (प्रतिनिधी) : अक्कलकुवा शहरातील शिक्षक कॉलनी येथे अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून प्रवेश करत सोन्याचे मंगळसूत्र, चांदीच्या मूर्ती व रोख रक्कम असा एकूण १ लाख ४२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. ही घटना १२ सप्टेंबर रोजी पहाटे उघडकीस आली. याबाबत भटू त्र्यंबक मराठे (वय ६१, सेवानिवृत्त शिपाई, रा. शिक्षक कॉलनी, अक्कलकुवा) यांनी अक्कलकुवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार, दहा सप्टेंबर रोजी दुपारी एक वाजेपासून १२ सप्टेंबर रोजी पहाटे साडेचार दरम्यान अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. चोरट्याने घरातील लोखंडी कपाटाचे लॉक तोडून त्यातून अंदाजे एक लाख २० हजार रुपये किमतीचे तीस ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र, दहा रुपयांची रोख रक्कम, तसेच बारा हजार रुपये किमतीच्या चांदीच्या खंडेराव, वीर व मुंज्याच्या मुर्ती आणि लक्ष्मीचे चांदीचे नाणे असा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(अ), ३३१(३), ३३४(१) अन्वये अक्कलकुवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक अर्जुन पटले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक वृषाली गांगुर्डे तपास करीत आहेत.

## मागणीला मंत्री उदय सामंत यांची मंजुरी शहाद्यातील श्रीखेड ठरले पुस्तकाचे गाव

**शहादा, दि. १३ (का. प्र.) : साहित्यिकांच्या संवादातून शहादा तालुक्यातील श्रीखेड गावाची नंदुरबार जिल्ह्यातील पुस्तकाचे गाव म्हणून घोषणा करण्यात आली आहे. विद्रोही सांस्कृतिक व साहित्य चळवळीचे कार्यकर्ते तथा साहित्यिक दादाभाई पिंपळे यांनी केलेल्या मागणीला मंत्री उदय सामंत यांनी मंजुरी दिली. या निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत करण्यात येत आहे.**

मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या नंदुरबार जिल्हा दौऱ्यादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयातील बिरसा मुंडा सभागृहात जिल्ह्यातील साहित्यिकांशी विशेष संवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्ह्यातील साहित्यिकांनी मराठी भाषेचा महिमा आणि सामाजिक वास्तव या विषयांवर कविता व विचारांच्या माध्यमातून सादरीकरण केले. याच कार्यक्रमात विद्रोही सांस्कृतिक व साहित्य चळवळीचे कार्यकर्ते दादाभाई पिंपळे यांनी नंदुरबार जिल्ह्यातील कष्टकरी, दलित आणि आदिवासी समाजासाठी प्रेरणास्थान असलेले ज्येष्ठ साहित्यिक वाहरू दादा सोनवणे यांचे गाव असलेल्या श्रीखेडला पुस्तकाचे गाव म्हणून घोषित करण्याची आग्रही मागणी केली. मंत्री उदय सामंत यांनी जिल्ह्यातील पुस्तकाचे गाव उपक्रमासाठी गावाचे नाव सुचवण्याचे आवाहन केले होते. मात्र, सभागृहातील उपस्थित साहित्यिकांमधून कोणतेही ठोस नाव पुढे येत नव्हते. त्यावेळी दादाभाई पिंपळे यांनी पुढाकार घेत शहादा तालुक्यातील श्रीखेड गावाचे नाव सुचविले. या प्रस्तावावर मंत्री उदय सामंत यांनी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्याशी विचारविनिमय केला. त्यानंतर सभागृहात उपस्थित साहित्यिकांची संमती घेण्यात आली. सर्व साहित्यिकांनी प्रस्तावाला एकमताने पाठिंबा दिल्यानंतर मंत्री उदय सामंत यांनी श्रीखेड गावाची नंदुरबार जिल्ह्यातील पुस्तकाचे गाव म्हणून घोषणा केली. श्रीखेड हे ज्येष्ठ साहित्यिक वाहरू सोनवणे यांचे गाव असल्याने या घोषणेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. गावात साहित्यविषयक उपक्रम, वाचन संस्कृती आणि पुस्तकांशी संबंधित विविध उपक्रमांना चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निर्णयाबद्दल दादाभाई पिंपळे यांनी मंत्री उदय सामंत, आमदार चंद्रकांत रघुवंशी तसेच उपस्थित सर्व साहित्यिकांचे आभार मानले.

### फर्निचर दुकानाला आग लाखोंचे साहित्य खाक

धुळे, दि.१३- कासारे (ता. साक्री) येथील प्लायवूड आणि हार्डवेअर फर्निचरच्या दुकानास अज्ञात व्यक्तीने आग लावली. त्यात साडेतीन लाखाचे फर्निचर खाक होऊन नुकसान झाले.

कासारे गावातील विश्वकर्मा मंदिरा जवळ विनोद शांताराम सोनवणे (वय ४२ , रा. कासारे) यांचे गणेश प्लायवुड ॲण्ड हार्डवेअर फर्निचरचे दुकान आहे. शेडचे लोखंडी पत्रा टॅमीच्या सहायाने उचकावला. डिझेल व ऑईलच्या सहायाने जाणीव पुर्वक व हेतु पुरस्कर आग लावली. त्यात दुकानातील साडेतीन लाखाचा मुददेमाल जाळुन नष्ट केला. त्यात लाकडी मंदीर, दरवाजे, टिपॉय, चौकटी, लाकडी पटटया, कपाटी ४ नग, अवजारे आधी साहित्याचा समावेश आहे. याप्रकरणी साक्री पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

### अजंगला घरफोडी

धुळे, दि.११- अजंग (ता. धुळे) येथील शेतकऱ्याच्या घरातून चोरट्यांनी ४३ हजाराचा ऐवज चोरून नेला.

शिवाजी जगन्नाथ पाटील यांचे अजंग येथे घर आहे. घराचे कुलूप कडी कोयंडा तोडुन चोरट्यांनी कपाट फोडले. कपाटातील सोन्याचे टोगल, काप, डोरले, सात हजारांची रोकड असा एकूण ४३ हजाराचा ऐवज चोरून नेला.

## गणेशोत्सव साजरा करताना कायदा व सुव्यवस्था राखा पो.अधी. विशाल सिंगुरी

**धुळे दि.१३- शहरासह, जिल्ह्यातील नागरिक, गणेश मंडळांनी गणेशोत्सव साजरा करताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी केले.**



श्री. आनंद यांनी आवाहन केले की, सर्व गणेश मंडळ व मंडळाचे पदाधिकारी यांनी शासनातर्फे दिलेल्या अटी शर्ती, सुचनांचे पालन करावे. ते सप्टेंबर या दरम्यान गणेशोत्सव साजरा होणार आहे. त्या निमीत्ताने सर्व नागरिक, गणेश मंडळांनी दोन धर्म, समाज, पक्ष यांच्यात तंटा निर्माण होणार नाही, त्यातुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी. ध्वनी प्रदुषणा बाबत जे अटी व नियम लागु केले आहेत, त्याचे काटेकोरपणे पालन करावे, कोणीही ध्वनी प्रदुषणाचे उल्लंघन करु नये. प्रत्येक गणेश मंडळाने गणेशोत्सव काळात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवावेत, जेणेकरुन कोणतीही हानी निर्माण होणार नाही. तसेच स्थानिक पोलीसांच्या मदतीने पोलीस मित्रांचा उपयोग करुन घ्यावा. ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले देखावे पाहण्यासाठी येतात. त्यांची सुरक्षेची जबाबदार ही पोलीसांचीच नसुन गणेश मंडळांचे पदाधिकारी यांचीही आहे. महाराष्ट्र पोलीस दलातर्फे डायल ११२ हा हेल्पलाईन क्रमांक आहे. नागरिकांना काही त्रास किंवा अडी-अडचण असल्यास, मदत लागल्यास आपल्या भ्रमणध्वनीव्दारे या हेल्पलाईन क्रमांकावर फोन केल्यास आपणांस लागलीच पोलीस मदत मिळेल. शासनातर्फे संपुर्ण राज्यात नशा मुक्त महाराष्ट्र करण्याची संकल्पना राबविण्यात येत आहे. नागरिकांनी धुळे जिल्हा नशा मुक्तसाठी पोलीसांना सहकार्य करावे. आपला परिवारातील, परिसरातील नागरिकांना नशा मुक्तसाठी आवाहन करावे, असे आवाहन जिल्हा पोलीस प्रशासनातर्फे करण्यात आले.

### वडजाईलगत विहिरीत पडून महिलेचा मृत्यू

धुळे, दि. १३ : वडजाईलगत अन्वर नाला परिसरात पाणी भरण्यासाठी गेलेल्या महिलेचा विहिरीत पडून बुडाल्याने मृत्यू झाला. ही घटना शनिवारी (दि. १२) सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली. इंदुबाई पिंटू हाके (वय २०, रा. वडेल, ता. धुळे, ह. मु. अन्वर नाला परिसर) असे मृत महिलेचे नाव आहे. इंदुबाई शनिवारी सकाळी घराजवळील विहिरीवर पाणी भरण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी पाय घसरल्याने त्या विहिरीत पडल्या आणि पाण्यात बुडाल्या.

घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत इंदुबाईंना विहिरीतून बाहेर काढले. त्यांना उपचारासाठी धुळे जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. भैरव वडजे यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. याप्रकरणी मोहाडी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## शिंदे-फडणवीसांचा माझ्या विरोधात कट शुट केले तरीही शरणागती नाही : जरांगे

**जालना, दि. १३ : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईकडे निघण्याची तयारी सुरू असताना मनोज जरांगे पाटील यांनी आज (रविवारी) अंतरवाली सराटीतून केलेल्या भाषणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले. माझ्याविरोधात कट शिजला असून मराठा मोर्चात गोंधळ घडवून मला गोळ्या घालण्याचा डाव असल्याचा दावा जरांगे यांनी केला. भाजप आणि शिंदे गटातील काही मराठा आमदारांकडून मोर्चाला जाऊ नये, यासाठी फोन केले जात असल्याचेही जरांगे यांनी म्हटले.**

मोर्चात गोळ्या घालण्याचा डाव आहे. मराठ्यांना न मारता फक्त मला शूट करणार आहेत. मात्र, मी शरण येणार नाही, असे जरांगे यांनी म्हटले. मराठा समाजाला भावनिक आवाहन करताना, साथ द्यायची नसेल तर देऊ नका आणि भीती वाटत असेल तर घरात बसा. मुंबईला जाताना मात्र या आणि त्यानंतर माझ्या अंत्ययात्रेला या, असेही ते म्हणाले.

जरांगे-पाटील यांनी १९ सप्टेंबर रोजी मुंबईत पोहोचून सकाळी १० वाजता आझाद मैदानावर उपोषणाला बसण्याचा निर्धार व्यक्त केला. उपोषणासाठी परवानगी मागण्यात आली असून, परवानगी द्यायची की नाही, हा निर्णय सरकारने घ्यावा, असे त्यांनी म्हटले. मी मुंबईला जाणारच. माझी काय चूक आहे? मी कायद्याचे उल्लंघन करत आहे का? सरकारने अटी-शर्ती घालायच्या असतील तर घालाव्यात. आम्ही कायद्याला मानतो, असे जरांगे यांनी सांगितले.

चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही जरांगे यांनी टीका केली. तसेच केंद्रातील आपल्या समर्थकांचा उल्लेख करत काही मंत्र्यांना अडचणीत आणण्याचा इशाराही त्यांनी दिला. एकनाथ शिंदे यांच्यावर विश्वास ठेवून आपण वाशीतून जीआर घेऊन आलो होतो, असे सांगत जरांगे यांनी शिंदे यांच्यावरही सवाल उपस्थित केला. फडणवीस यांनी मराठा समाजाच्या सर्व मागण्या मान्य केल्या आणि त्यांच्याशी चांगले संबंध निर्माण झाले, तर इतरांचे काय होईल, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. चौकशा लावल्या तरी आपण शरण येणार नसून मरण पत्करेन, पण शरण येणार नाही, अशी आक्रमक भूमिका जरांगे यांनी मांडली.


**काामे करुन मिळतील**

मालमत्ता (घर, दुकान, जमीन) सिटी सर्वे ऑफिस उतारे, तलाठी ऑफिस उतारे, नाव लावणेबाबत व मालमत्ता विषयक सर्व कामे करुन मिळतील!

-: संपर्क :-

8888022577

झाडे लावा झाले जगवा

**पाहिजेत**

कापड दुकानासाठी फुल टाईम/पार्ट टाईम २ सेल्समन आणि २ हेल्पर पाहिजे.

-: भेटा :-

सोना लेडीज वेअर किड्स वेअर

पारोळा रोड, धुळे

मो. 9767544005

**विकणे आहे**

अजळकर नगर रो हाऊस विकणे. सुरत बायपास जवळ अजळकर नगरमध्ये दोनमजली रोहाऊस घर फर्निचरसह विकणे आहे.

-:संपर्क:-

डी.आर.प्रॉपर्टीज 94222 89693

**विकणे आहे**

नकाने रोडटच पाच एकर

नकाने रोट टच गावाला लागून पाच एकर जागा विकणे आहे.

-:संपर्क:-

डी.आर.प्रॉपर्टीज 94222 89693

**विकणे आहे**

रामचंद्र नगर काँक्रीट रोडटच प्लॉट विकणे

कॉटन मार्केटच्या पुढे, रामचंद्र नगरमध्ये ६० फुटी काँक्रीट रोडला लागून ४३०० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.

-:संपर्क:-

डी.आर.प्रॉपर्टीज 94222 89693

**विकणे आहे**

अग्रवाल नगरच्या बाजूला 4 बीएचके फ्लॅट.

अग्रवाल नगर जवळ नवीन 4 BHK बीएचके फ्लॅट त्वरीत विकणे आहे.

-:संपर्क:-

डी.आर.प्रॉपर्टीज 94222 89693

**प्लॉट विकणे आहे**

महिंदळे शिवार येथील स.नं. १०६/१ अ १/ पैकी प्लॉट नं. ४२ क्षे. १९९० चौ. फुट बखळ प्लॉट विकणे आहे.

-:संपर्क:-

लता विश्वास कुवर

9850415576

7972369619

**पाहिजेत**

मेडिकलमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत.

-:संपर्क:-

9881118707

234494/237494

**पाहिजेत**

ऑफिस बॉय : २

सेल्स एक्झीक्युटिव्ह : २

टॅली ऑपरेटर :२

-:संपर्क:-

अभिराम एंटर प्रायजेस

ग. नं. ४, क्रांती कॉम्पलेक्स शनिमंदिर समोर, धुळे

धुळ्यात 'प्लास्टो' आणी इतर सर्व नामांकित कंपनीच्या पाण्याच्या टाक्या आमच्याकडे होलसेल रेटमध्ये उपलब्ध आहेत..




१०० ते १०,००० लिटर पर्यंत गोल व चौरस टाक्या होलसेल रेट व हजर स्टॉक मध्ये उपलब्ध आहे.

धुळ्यात प्लास्टो कंपनीच्या टाक्या मिळण्याचे एकमेव ठिकाण...

शंकर विजय सॉ मिल

प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे.

फो. 9422285091

गरम पाण्याचा एकच उपाय...

BAJAJ Crompton Racold USHA




आजच खरेदी करा आणि मिळवा पाईप सोबत फिटिंग फ्री *...

59 वर्षापासून आपल्या सेवेत...

अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ■ फोनः 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०